लोकमत दि. 10/07/2023

## अमरनाथ यात्रा : जिवाची पर्वा न करता दाखविली माणुसकी

लोकमत दि 10/07/2023

# नांदेडच्या पोलिस अन मित्राने वाचविला यात्रेकरू महिलेचा जीव



थेट काश्मीरमधून
शिवराज बिचेवार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** अमरनाथ गुफेपासून दर्शन घेऊन भाविक बालटाल बेस कॅम्पच्या दिशेने उतरत असताना प्रचंड पाऊस आणि दरडी कोसळण्यास सुरुवात झाली. अशा भयावह परिस्थितीत भाविक जीव मुठीत घेऊन धावत होते. त्याचवेळी सोनपथ येथील एक वृद्ध महिला यात्रेकरू रस्त्यात एकटीच अडखळली. तिच्या मागेपुढे कोणीच दिसत नसल्याने हतबल झाली. अशा कठीण प्रसंगी स्वतच्या जिवाची पर्वा न करता नांदेड पोलिस दलातील एक कर्मचारी व नांदेड कोर्टातील लिपिक वृद्धेच्या मदतीसाठी धावून आले. आपला जीव धोक्यात घालून या कर्मचारी मित्रांनी वृद्धेला आधार देत बेस कॅम्पपर्यंत आणले.



### बेटा, मुझको लेके चलो...

१ दरडी कोसळत असल्याने काही भाविकांना पंचतरणी येथेच रोखण्यात आले. तर काही भाविक पायी खाली उतरत होते. गुफेपासून ७ किमी अंतरावर आले. तेवढ्यात दरडी कोसळत असल्याने सर्व जण चालण्याऐवजी जिवाच्या आकांताने धावत सुटले होते.

२ दरडीकडे पहायचे अन् पळायचे असे सुरू असताना ५५ वर्षीय सोनपथ येथील महिला अडखळली. धावता येत नसल्यामुळे हतबल झाली. आता आपले काही खरे नाही, या भीतीने तिने अनेकांना मदतीसाठी विनंती ही केली.

३ परंतु प्रत्येकाला आपल्या जिवाचे पडले होते. तोच पोलिस कर्मचारी संजय सांगवीकर आणि त्यांचे मित्र सचिन शेटकर या दोघांचे लक्ष मदतीसाठी आसुसलेल्या वृद्धेकडे गेले. त्याचवेळी महिलेने त्यांना 'बेटा मुझे साथ लेके चलो' म्हणून विनंती केली.

४ यावेळी संजय सांगवीकर व त्यांचे मित्र सचिन शेटकर यांनी क्षणाचाही विचार न करता महिलेला आधार देऊन सुखरूप ४ किलोमीटर खाली आणले.

पोलिस कर्मचारी संजय सांगवीकर यांच्यासह नांदेडच्या १८ जणांनी पहलगाम मार्गे यात्रेला सुरुवात केली होती. पंचतरणी येथे मुक्काम केल्यानंतर पहाटे चार वाजता पावसातच ते गुहेकडे निघाले. दर्शन झाल्यानंतर बालटाल दिशेने खाली उतरत असताना पावसाचा जोर वाढला होता.

लोकमत दि 10/07/2023

## आरोग्य तपासणी शिबिराचा असा झाला फायदा

# तपासणीमुळे मिळाले पोलिसाला जीवनदान

लोकमत दि 10/07/2023

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुखेड :** पोलिस प्रशासनाने जिल्ह्यातील पोलिसांची आरोग्य तपासणी मोहीम राबविल्यामुळे एका पोलिसाला जीवनदान मिळाल्याची घटना घडली.

गुरुवारी सकाळी १० वाजता पोलिस बाळासाहेब धोंडगे वय ४७ हे आरोग्य तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात आले असताना ईसीजी काढण्यात आला होता. त्यांना काही वेळापूर्वी हृदयविकाराचा झटका येऊन गेल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे तात्काळ प्राथमिक उपचार करून डॉ. संतोष टांकसाळे यांनी धोंडगे यांना उपचारासाठी नांदेडला पाठवले आहे. यावेळी ईसीजी तंत्रज्ञ अभिनंदन पांचाळ व परिचारिक व्रिजय कोनापुरे यांनी उपचारासाठी मदत केली.

विविध वृत्त

मुखेड तालुक्यातील मुखेड पोलिस ठाण्यातील व मुक्रमाबाद पोलिस ठाण्यातील आजपर्यंत एकूण ४५ पोलिस हवालदार, पोलिस नाईक, पोलिस जमादार यांची आरोग्य तपासणी ज्यात ईसीजी, एक्सरे, रक्ततपासणी अशा अनेक तपासणी करून वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र देण्यात येते. एकीकडे मुखेड तालुक्यातील दोन पोलिस ठाण्यात पोलिसांची संख्या क्षमतेपेक्षा कमी आहे . यामुळे पोलिसांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

## पोलिसांच्या सिंगमगिरीची गरज

- **माहूर :** माहूर हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पीठ असल्याने देशभर परिचित आहे. त्यामुळे येथे देशभरातून दररोज हजारोंच्या संख्येने भाविक येत असतात. मात्र, याच शहरात शेजारच्या विदर्भातून व तेलंगणातून गुन्हेगारीचे जाळे पसरल्याने या तीर्थक्षेत्रावर अवैध धंदे मोठ्या प्रमाणात बोकाळले आहेत. त्यामध्ये रेतीचे अवैध उत्खनन व तस्करी, मटका, गुटखा, ऑनलाइन मटका, जुगार अड्डे, वेश्यालये आदी बाबींचा समावेश आहे.
- माहूर शहरात गत तीन चार महिन्यांत झालेल्या विविध घरफोड्या, मोटरसायकल चोऱ्या आदी घटनेत माहूर तीर्थक्षेत्रावर प्रचंड वाढ झालेली दिसून येते. याच अवैध व्यवसायांच्या माध्यमातून अवैध पैसे कमावलेली काही मंडळी दादाच बनलो या अविर्भावात अनेक सुशिक्षित बेरोजगार युवकांना गळाला लावून संघटित गुन्हेगारी करण्यास पुढे येत असल्याचे दिसत आहे.




- जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी विशेष लक्ष द्यावे अशी मागणी शांतता व सुव्यवस्था प्रेमी नागरिकांनी केली आहे.